(1) Notice is hereby given that the 30th Annual General Meeting (AGM) of the Company is scheduled to be held at 01:00 P.M., on Monday, the September 22, 2025 through Video Conferencing / Other Audio Visual Means (VC/OAVM), in compliance with the General Circular No.09/2023 dated 25.09.2023 read with Circular No.20/2020 dated 05.05.2020 issued by Ministry of Corporate Affairs (MCA) and Circular No.SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/2023/ 167 dated 07.10.2023 read with Master Circular No.SEBI/HO/CFD/PoD2/CIR/P/2023/120 dated 11.07.2023 issued by SEBI (hereinafter collectively referred to as 'Circulars') and also applicable provisions of the Companies Act, 2013 and the Rules made thereunder.
(2) In compliance with the above Circulars, electronic copies of the Notice of the AGM and the Annual Report for the year 2024-25 have been sent to all the Members on August 29, 2025 whose e-Mail IDs are registered with the Company / Registrar and Transfer Agent (RTA), M/s Cameo corporate services limited / Depository Participant(s) (DP).
However, members can also download the AGM Notice and Annual Report from the Company's website www.khazanchi.co.in and the website of Stock Exchanges at www.bseindia.com.
(3) The Members whose e-Mail addresses are not registered with the RTA / DP are required to follow the procedure laid down in the Notice of the AGM, in order to receive the Notice of the AGM and Annual Report.
(4) Pursuant to Section 91 of the Companies Act, 2013 and the Rules made thereunder and Regulation 42 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Register of Members and Share Transfer Books of the Company will remain closed from Tuesday, September 16, 2025 to Monday, September 22, 2025 (both days inclusive) for the purpose of Annual General Meeting.
(5) The Members holding shares either in physical form or dematerialized form, as on the cut-off date (i.e.) September 15, 2025, may cast their vote electronically on the businesses as set out in the Notice of the AGM through electronic voting system of Central Depository Services (India) Limited (CDSL) either through remote e-Voting or e-Voting during the AGM.
(6) The Board of Directors have appointed M/s. A K Jain & Associates, Practising Company Secretaries, represented by Mr. Pankaj Mehta as the Scrutinizer for conducting both the remote e-Voting and e-Voting during the AGM in a fair and transparent manner.
(7) The Members are hereby informed that:
(i) The businesses as set out in the Notice of the AGM may be transacted through remote e-Voting or e-Voting during the AGM.
(ii) The remote e-Voting shall commence at 9.00 a.m., on Friday, the September 19, 2025.
(iii) The remote e-Voting shall end at 5.00 p.m., on Sunday, the September 21, 2025.
(iv) The remote e-Voting module will be disabled after 5.00 p.m., on September 21, 2025.
(v) The cut-off date for determining the eligibility to vote either through remote e-Voting or by e-Voting during the AGM is September 15, 2025.
(vi) The Members may note that:
(a) The remote e-Voting module shall be disabled after 5.00 p.m., on September 21, 2025 and once the votes on the resolution is cast by the Member, the Member shall not be allowed to change it subsequently.
(b) The facility for voting will also be available during the AGM and those Members present in the AGM through VC / OAVM facility, who have not cast their vote on the resolutions through remote e-Voting and are otherwise not barred from doing so, shall be eligible to vote through the e-Voting during the AGM.
(c) The Members who have cast their votes by remote e-Voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their votes again; and
(d) A person whose name is recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained by the Depositories as on the cut-off date shall be entitled to avail the facility of remote e-Voting or e-Voting during the AGM.
(vii) The manner of voting remotely for Members holding shares in dematerialized mode, physical mode and for Members who have not registered their e-Mail addresses is provided in the Notice of the AGM which is also available on the website of the Company www.khazanchi.co.in
(viii) For any queries or issues regarding attending AGM and e-Voting from the e-Voting System, you may refer the Frequently Asked Questions (FAQs) and e-Voting manual available at www.evotingindia.com under Help Section or write an e-Mail to helpdesk.evoting@cdslindia.com or contact Mr Rakesh Delvi (022 – 23058542) of CDSL or or call toll free no. 1800 21 09911.

For Khazanchi Jewellers Limited
Sakshi Jain
Company Secretary
Place: Chennai
Date: August 30, 2025

# 'म्हाडा'चे स्वस्तातले घर पडले १.४६ कोटी रुपयांना

## आठ जणांची फसवणूक; तिघांविरोधात गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क



**मुंबई :** म्हाडाचा फ्लॅट स्वस्त दरात देण्याचे प्रलोभन दाखवत गृहिणीसह आठ जणांची एक कोटी ४६ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी किरण बोडके, अशोक इंगोले आणि तुषार साटम उर्फ राजू या तिघांविरोधात गोरेगाव पोलिस ठाण्यात २९ ऑगस्टला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालाड पश्चिमेला राहणाऱ्या तक्रारदार महिलेला घर खरेदी करायचे होते. त्याच इमारतीत राहणाऱ्या त्यांच्या पतीच्या मित्राने, स्वस्तातले म्हाडा घर खरेदी करण्यासाठी राजू साटमचे नाव सुचवले. त्यानुसार ही महिला आणि तिच्या पतीने २६ मार्चला अशोक इंगोलेची अशोका शॉपिंग सेंटरमध्ये भेट घेतली. तिथे इंगोलेने आपण मनसेचा नेता असून आपले पक्ष कार्यालय असल्याचे त्यांना सांगितले. तसेच मी, साटम आणि किरण बोडके पार्टनर असून, म्हाडाचे फ्लॅट स्वस्तात मिळवून देतो, असेही इंगोलेने सांगितले.

आरोपींनी गोरेगाव पश्चिमेच्या पहाडी परिसरातील 'ई' विंगमधील फ्लॅट क्रमांक ७०८ दाखवला आणि अक्षय चव्हाण या घरमालकाला ४७ लाखांना तो विकायचा असल्याचे सांगितले. टोकन म्हणून ५० हजार रुपये आणि नंतर टप्प्याटप्प्याने एकूण ३४ लाख रुपये तक्रारदार महिलेने दिले. मात्र, फ्लॅटचा ताबा आरोपींनी दिला नाही.

अशाच पद्धतीने आणखी सात जणांची फसवणूक करण्यात आल्याचे तक्रारदार महिलेला समजले. त्यानंतर सर्वांनी आरोपींकडे पैशांचा तगादा लावला. परंतु आरोपींनी फोन स्वीकारणे बंद केले.

# आदिवासी कुटुंबाला मारहाण

## मुलीसोबत गणपती दर्शनाला गेल्याचा काढला वचपा; ९ जणांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**आगरदांडा :** गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी घरी गेलेल्या रागातून रोहा तालुक्यातल्या आदिवासी कुटुंबातील पाच जणांना मारहाण करण्यात आली. या प्रकरणी मुरुड पोलिसांनी गुन्हा दाखल करून नऊ जणांना अटक केली. या आरोपींना न्यायालयात हजर केले असता जिल्हा न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनाविल्याचे पोलिसांनी सांगितले.

रोहा तालुक्यातील भालगाव येथील आदिवासी वाडीत राहणारा सुमीत मंगेश वाघमारे हा मिठागर येथील मुलीसोबत तिच्या घरी गणपतीचे दर्शन घेण्यासाठी गेला असता. त्याचा राग धरुन मिठागर येथील नऊ जणांनी २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.४५ च्या दरम्यान जमाव जमवून भालगाव येथील आदिवासी वाडी येथील रस्तावर येऊन मंगेश महादेव वाघमारे यांना हाताबुक्याने आणि लाथेने मारहाण केली. त्यांची पत्नी संगिता, मुलगा साहिल आणि काका चंदर श्रावण वाघमारे यांच्या डाव्या हातावर मारहाण केली.

चुलत भाऊ राम चंदर वाघमारे यांच्या डोक्यावर तसेच त्यांचा मुलगा सागर वाघमारे यांच्या उजव्या पायाचे पोटरीवर चाकुने वार करुन गंभीर दुखापत केली. याची माहिती मिळताच मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे व पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना प्रथम मुरुड ग्रामीण रुग्णालयात नेले.

दरम्सान, मारहाणीची माहिती मिळताच अलिबाग रायगड उपविभागीय पोलिस अधिकारी माया मोरे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ऐन गणेशोत्सवात ही घटना घडल्याने कायदा व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणा सर्तक झाल्या आहेत.



### हे आहेत आरोपी

फिर्यादी मंगेश महादेव वाघमारे (४२) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दिपेश कृष्णा ठाकूर, विजय विठ्ठल पाटील, परेश कृष्णा ठाकूर, विराज विजय ठाकूर, करण विठोबा चिपकर, सुजय संतोष शहापुरकर, दिपेश दत्ताराम माळी, विनिते विजय ठाकूर, सागर पांडुरंग ठाकूर (सर्व रा. मिठागर पो.सावली ता.मुरुड) यांच्याविरोधात मुरुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आला आहे. मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे तपास करीत आहेत.

# बिलासाठी मागितली ३० हजारांची लाच; बोरिवलीच्या ग्रामसेविकेवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क



**भिवंडी :** कंत्राटदाराच्या कामाचे बिल पूर्ण करण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या बोरिवली येथील ग्रामविकास अधिकारी विद्या बनसोडे (४६) यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. त्यांच्याविरोधात पडघा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार कंत्राटदाराने पडघाजवळील बोरिवली ग्रामपंचायतीच्या हद्दीत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम केले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे मंजूर बिल काढण्यासाठी ते ग्रामविकास अधिकारी विद्या बनसोडे यांच्याकडे गेले. बनसोडे यांनी देयकाची संपूर्ण रक्कम हवी असल्यास देयकाच्या तीन टक्के म्हणजे ३० हजार रुपये लाच म्हणून देण्याची मागणी केली. कंत्राटदाराने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल करताच संबंधित पथकाने त्वरित कारवाई केली.


## जाहिरात

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षासाठीचे प्रस्ताव मागविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी व्हावी या हेतुने शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dhepune@gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन निर्णय दिनांक १५.१२.२०११ मध्ये नमुद केल्यानुसार इच्छुकांचे प्रस्ताव दि. ०१.१०.२०२५ पर्यंत अंतिमतः मागविण्यात येत आहेत. (सन २०२३-२४ व २०२४-२५ या दोन वर्षासाठीच्या पुरस्कारासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.)

तरी इच्छुकांनी शासन निर्णय पाहून आपले परिपूर्ण प्रस्ताव खालील प्रपत्रात माहिती भरून त्यांच्या पृष्ठयर्थ पुरावे म्हणून प्राप्त प्रशस्तिपत्रके, वर्तमानपत्रातील कात्रणे, अद्ययावत पोलिस पडताळणी अहवालासह संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) बहिरट पाटील चौक, हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजसमोर, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११०१६, येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाद्वारे ३ प्रतीत ०१.१०.२०२५ पर्यंत सादर करण्यात यावेत. प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रपत्राचा नमुना खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व पत्ता | दूरध्वनी क्र./ मोबाइल क्र. | शिक्षण | केलेल्या कार्याचा तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | | |

दिनांक : ०१.१०.२०२५ नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**टीप :** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार ही योजना फक्त सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांसाठीच आहे.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

(DGIPR-2025-26/क्र.5/C-2326)



**Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere**
Website: www.dbatu.ac.in, E-mail: registrar@dbatu.ac.in
academicsection@dbatu.ac.in

**Institute Level Round For First Year Admissions Against CAP 2025-26**

The Institute Level Round for admissions against CAP vacancies is schedule as follows:

| 03/09/2025 | First Year M.Tech (PG Course) |
|---|---|

The available admissions vacancies for First Year Engineering and Master level programs and other information details (Fees, Admissions rules etc.) are available on **www.dbatu.ac.in**

Sd/-
(Dr. A. P. Shesh)
REGISTRAR
Dr. Babasaheb Ambedkar Technological University
Lonere-402103
Tal. Mangaon Dist. Raigad (Maharashtra)


# 'सलाम किसान'च्या ड्रोन शेतीक्रांतीला नवी गती

**मुंबई :** 'पीआरवायएम' ग्रुपचा भाग आणि सलाम किसानच्या तंत्रज्ञानाचा आधार असलेल्या 'पीआरवायएम' एरोस्पेसने स्वदेशी 'अर्जुना' ड्रोनसाठी 'डीजीसीए'कडून टाइप सर्टिफिकेशन मिळवले आहे. यामुळे सलाम किसानच्या कृषी ड्रोन सेवांना देशभरात प्रभावीपणे विस्तारण्यासाठी ताकद मिळाली आहे.

दावोस येथे वर्षाच्या सुरुवातीला वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्र सरकारबरोबर ३०० कोटींचा महत्त्वाचा करार करणाऱ्या 'पीआरवायएम' ग्रुपने आज त्या वचनांची पूर्तता केली आहे. कमी कालावधीत मिळालेले हे यश सलाम किसानच्या मिशनला गती देऊन लाखो शेतकऱ्यांपर्यंत अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञान पोहोचवून कृषी क्षेत्रात मोठा बदल घडवून आणणार आहे.

पीआरवायएम ग्रुपच्या संस्थापक आणि सीईओ धनश्री मंधानी म्हणाल्या, हे फक्त एक प्रमाणपत्र नाही, तर भारताला जागतिक दर्जाचे स्वदेशी ड्रोन तंत्रज्ञान विकसित करण्याची ताकद असल्याचा पुरावा आहे. सलाम किसानने ३ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना ड्रोन फवारणी आणि प्रिसिजन फार्मिंगच्या तंत्रज्ञानाने सक्षम केले आहे.

डीजीसीएने प्रशिक्षण आणि ड्रोन दोन्हीला मान्यता दिल्याने आता आम्ही या सेवेचा जलद विस्तार करून शेतकरी आणि ग्रामीण उद्योजकांसाठी एक समृद्ध आणि टिकाऊ वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी सांगितले. (वा. प्र.)

**सहा हजार लोकसंख्येच्या लिंबागणेश गावाने २२५ वर्षांपासून 'एक गाव - एक गणपती'ची परंपरा जपली. येथे गणेशोत्सव पाच दिवसांचा असतो. - ८**

# रिक्षाचालकावर हल्ला; कामगार अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**भातसानगर :** पिठाच्या गोणी रिक्षेत व्यवस्थित टाक, असे सांगणाऱ्या रिक्षाचालकास शिवीगाळ करीत डोक्यात गंभीर दुखापत करणाऱ्या परप्रांतीय कामगाराला शहापूर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी रविवारी दुपारी हा प्रकार घडला.

गुरुदत्त किराणा स्टोअर्सचे मालक खिसमतराव यांच्या सांगण्यावरून रिक्षाचालक गणपत गोरे हे शहापुरातील न्यू पटेल किराणा दुकानात सामान घेण्यासाठी आले होते. या किराणा दुकानातील कामगार पिठाच्या गोण्या रिक्षेत टाकत होते. त्यावेळी पिठाच्या गोण्या रिक्षेत व्यवस्थित ठेव, असे गोरे यांनी कामगाराला सांगितले. त्याचा राग आल्याने कामगार खिमाराम चौधरी याने शिवीगाळ करीत डोक्यात धान्य मोजण्याच्या मापाने रिक्षाचालक गोरे यांना गंभीर दुखापत केली. याप्रकरणी शहापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक: 01.09.2025**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे.

**अनु क्रमांक 1. कामाचे नाव** - एसएसई/माणगाव सेक्शन अंतर्गत स्टेशन यार्ड, पूल आणि टनेल पोर्टल्समधील ट्रॅकची गवत काढणी. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-42, अंदाजित खर्च:** ₹ 15,14,809/-, **ईएमडी** - ₹ 30,300/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 23/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अनु क्रमांक 2. कामाचे नाव** - एसएसई/चिपळूण सेक्शन अंतर्गत स्टेशन यार्ड, पूल आणि टनेल पोर्टल्समधील ट्रॅकची गवत काढणी. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-44, अंदाजित खर्च:** ₹ 12,58,382/-, **ईएमडी** - ₹ 25,200/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 23/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अनु क्रमांक 3. कामाचे नाव** - एसएसई/रत्नागिरी सेक्शन अंतर्गत स्टेशन यार्ड, पूल आणि टनेल पोर्टल्समधील ट्रॅकची गवत काढणी. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-45, अंदाजित खर्च:** ₹ 13,78,890/-, **ईएमडी** - ₹ 27,600/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 23/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अनु क्रमांक 4. कामाचे नाव** - एसएसई/विलवडे सेक्शन अंतर्गत स्टेशन यार्ड, पूल आणि टनेल पोर्टल्समधील ट्रॅकची गवत काढणी. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-41, अंदाजित खर्च:** ₹ 13,47,261/-, **ईएमडी** - ₹ 27,000/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 23/09/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)


# कंटेनरची मेट्रोच्या वाहनाला धडक; चालक अडकला; अर्ध्या तासाने सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क



**ठाणे :** चालकाचे नियंत्रण सुटल्याने कंटेनरची मेट्रोच्या कामासाठी उभ्या असलेल्या वाहनाला धडक बसली. रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास हा अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही घटना घडली. यात कंटेनरचालक राम तेरज (४२) जखमी झाला. अडकलेल्या चालकाला अपघातग्रस्त वाहनातून सुखरूप बाहेर काढल्याची माहिती ठाणे पालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

घोडबंदर मार्गे मालवाहू कंटेनर घेऊन राम तेरज हा सुरतकडे जात होता. त्यावेळी रस्त्यावर मेट्रोच्या कामासाठी उभा असलेल्या वाहनाला कंटेनरची धडक बसली. या धडकेमुळे अपघातग्रस्त कंटेनरच्या केबिनमध्ये चालक राम हा अडकला होता. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या जवानांसह आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सुमारे २० ते २५ मिनिटांच्या प्रयत्नानंतर चालक रामला सुखरूप बाहेर काढले. राम याच्या दोन्ही पायांना किरकोळ दुखापत झाल्याने त्याच्यावर महापालिकेच्या रुग्णवाहिकेतील डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून त्याला कासारवडवली पोलिसांच्या ताब्यात दिले. अपघातामुळे ठाण्याकडून घोडबंदर रोडकडे जाणारी वाहतूक धीम्या गतीने सुरू होती. अपघातग्रस्त कंटेनर बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी खुला केल्याची माहिती सूत्रांनी दिली.


**झोडियाक क्लोथिंग कंपनी लिमिटेड**
CIN : L17100MH1984PLC033143
नोंदणीकृत कार्यालय :- नायलॉक हाऊस, २५४, डी-२, डॉ. ॲनी बेसंट रोड, वरळी, मुंबई ४०००३०. टेली : ६६६७७०००, फॅक्स ६६६७ ७२७९
वेबसाईट : www.zodiaconline.com ई मेल: contactus@zodiacmtc.com

**भागधारकांना सूचना - व्हिडियो कॉन्फरसिंग किंवा अन्य ऑडिओ व्हिज्युअल माध्यमाने ४१ व्या वार्षिक सर्व साधारण सभेबाबत माहिती**

याद्वारे सूचना देण्यात येते की झोडियाक क्लोदिंग कंपनी लिमिटेड ('कंपनी') च्या सदस्यांची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') सोमवार, २९ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता (आयएसटी) व्हिडिओ कॉन्फरन्स ('व्हीसी') किंवा इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('ओएव्हीएम') आयोजित केली जाईल जेणेकरून एजीएमच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे व्यवसायाचे व्यवहार करता येतील. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने १९ सप्टेंबर, २०२४ रोजीचे त्यांचे सामान्य परिपत्रक क्रमांक ०९/२०२४, वेळोवेळी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने ("एमसीए") जारी केलेले इतर परिपत्रक आणि ३ ऑक्टोबर, २०२४ रोजीचे परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी-पीओडी -२ /पी/सीआयआर /२०२४ /१३३ ('सेबी परिपत्रके') द्वारे सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएम आयोजित करण्याची परवानगी दिली आहे. त्यानुसार, कंपनी कायदा, २०१३ ('कायदा'), सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स'), एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रके यांच्यासह वाचल्या जाणाऱ्या लागू तरतुदींनुसार, कंपनीची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीसी/ओएव्हीएम द्वारे आयोजित केली जाईल आणि सदस्य केवळ व्हीसी/ओएव्हीएम द्वारे या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात.

वरील एमसीए आणि सेबीच्या परिपत्रकांनुसार, ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक अहवाल सर्व सदस्यांना फक्त कंपनीच्या आरटीए (केफिनटेक)/डिपॉझिटरी सहभागी(सहभागी) कडे नोंदणीकृत ईमेल पत्त्यांवर ईमेलद्वारे पाठवला जाईल. शिवाय, ज्या सदस्यांनी त्यांचा ईमेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ चा एकात्मिक वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेब-लिंक प्रदान करणारे पत्र पाठवले जाईल.

४१ व्या एजीएमची सूचना व वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता वार्षिक अहवाल कंपनीच्या www.zodiaconline.com आणि कंपनीचे शेअर्स जेथे सूचिबद्ध आहेत त्या बीएसई लिमिटेड (www.bseindia.com)आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड च्या (www.nseindia.com) वेबसाईट वर देखील उपलब्ध आहेत.

व्हीसी/ओएव्हिएम सुविधा कंपनीने मे.केफीनटेक्नॉलॉजीस लि. म्हणून ओळखले जाणारे कडून घेतले आहे. रिमोट ई वोटिंग किंवा एजीएम दरम्यान ई वोटिंगकरिता माहिती आणि ४१ व्या एजीएम मध्ये व्हीसी/ओएव्हिएममार्फत उपस्थित राहण्याची माहिती एजीएमच्या सूचनेत नमूद आहे आणि कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०३ अन्वये गणसंख्या उद्देशा करिता व्हीसी/ओएव्हिएम मार्फत उपस्थित सदस्यांची मोजणीकेलीजाईल.

विद्युत स्वरूपाने एजीएम मध्ये मंजूर करावयाचे नियोजित ठरावांवर त्यांचे मत देण्यासाठी भागधारकांना रिमोट ई वोटिंग किंवा ४१ व्या एजीएम दरम्यान ई वोटिंग सुविधा कंपनी देणार आहे. याबाबत डिमॅट स्वरूपात / वास्तविक स्वरूपात भागधारणा असणारे सदस्य आणि ज्यांनी त्यांचे ई-मेल नोंद /अद्ययावत केलेले नाहीत त्यांनी त्यांचे ई-मेल व मोबाईल क्रमांक त्यांचे ठेवीदार सहभागीदार / कंपनी आरटीए (केफिनटेक) कडे नोंद करून घ्यावेत जेणेकरून वार्षिक अहवाल एजीएम सूचना आणि कंपनीच्या ४१ व्या एजीएम करिता युजरआयडी व पासवर्ड सह मतदान सूचना प्राप्त करता येईल. काही प्रश्न असल्यास सदस्यांनी einward.ris@kfintech.com वर ई-मेल करावा किंवा संपर्क १८००३०९४००१ (टोल फ्री) करावा.

**झोडियाक क्लोथिंग कं. लिमिटेड करीता**
सही /-
कुमार अय्यर
कंपनी सचिव
मे. नं.:A9600

स्थळ : मुंबई
दिनांक :सप्टेंबर ०१, २०२५


# डीपी वर्ल्ड लॉजिस्टिक्स कंपनीचा आयात-निर्यात परवाना निलंबित

## जेएनपीए सीमा शुल्क विभागाच्या कारवाईमुळे धाबे दणाणले

लोकमत न्यूज नेटवर्क

**उरण :** नियमांचे उल्लंघन, कामात अनियमितता आणि तांत्रिक त्रुटीच्या आधारावर खोपटा-उरण येथील डीपी वर्ल्ड मल्टीमोडल लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा कार्गो कंटेनर आयात-निर्यात व्यवसाय परवाना जेएनपीए सीमा शुल्क विभागाने निलंबित केला आहे. यामुळे परिसरातील अन्य कंटेनर हाताळणी करणाऱ्या सीएफएसचे धाबे दणाणले.

खोपटा परिसरात डीपी वर्ल्ड मल्टीमोडल लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे गोदाम आहे. कंटेनर मालाची आयात-निर्यातीचा व्यापार करण्यासाठी जेएनपीए सीमा शुल्क विभागाने परवाना (लायसन्स) दिला होता.

नियमांचे उल्लंघन व कामकाजातील अनियमितता आणि तांत्रिक त्रुटीच्या आधारावर जेएनपीए सीमा शुल्क विभागाने २८ ऑगस्टला हा परवाना निलंबित केला आहे. जेएनसीएच्या सीमा शुल्कच्या आयुक्त (एनएस-जनरल) बी. सुमिदा देवी यांनी याबाबत नोटीस बजावली आहे. त्यानंतर कंपनीवर कारवाई करण्यात आल्याचे जेएनसीएच्या पथकाने सांगितले.


**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
**Tal. Panvel, Dist. Raigad. Pin No. 410 206**
Phone-27458040/41/42 Email- Panvelcorporation@gmail.com
Fire Office No-27461500 Fax No-022-27452233
Outword No/Pmc/Fire/ /S.N./1526 /2025 Date- 29/08/2025

**QUOTATION NOTICE**

Sealed quotations are invited by Panvel Municipal Corporation from the reputed agencies or registered contractors of the Govt. department for the work of:
1. Fabrication and Supply of 55 Meters Height Hydraulic Platform fully compliant with EN-1777 norms for Fire Fighting and Rescue Operations
2. Fabrication and Supply of 28 Meters Height Hydraulic Platform fully compliant with EN-1777 norms for Fire Fighting and Rescue Operations

For Fire Service Department of Panvel Municipal Corporation. The brief description of items is available at website www.mahatender.gov.in & in the office of Chief Fire Officer, Panvel Municipal Corporation, Opp. Gokhale Marriage Hall, Panvel - 410 206.

The sealed quotations in physical form of submission will be accepted from——— to ——— up to — p.m. in the office of the Chief Fire Officer, Panvel Municipal Corporation, Opp. Gokhale Marriage Hall, Panvel 410 206 and will be opened on——— at —— p.m. or as decided by Panvel Municipal Corporation. The quotations are called for estimation purpose only.

**Signed by**
**Kailas balu Gawade**
**Dy. Municipal Commissioner**
**Panvel Municipal Corporation**



रजिस्ट्री सं० डी एल०-33004/99 REGD.NO.D.L-33004/99

**भारत का राजपत्र**
**The Gazette of India**
सी.जी.-डी.एल.-अ.-21082025-265582
CG-DL-E-21082025-265582
असाधारण
EXTRAORDINARY
भाग II-खण्ड 3-उप-खण्ड (ii)
PART II-Section 3 -Sub-Section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं.3704] नई दिल्ली, बुधवार, ऑगस्ट 20, 2025/श्रावण 29, 1947
No.3704] NEW DELHI, WEDNESDAY, AUGUST 20, 2025/SHRAVANA 29, 1947

**रस्ते वाहतुक व राजमार्ग मंत्रालय**
**अधिसूचना**
**नवी दिल्ली, २० ऑगस्ट, २०२५**

**का.आ. 3808(अ)** ज्या अर्थी केंद्र सरकारने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 (1956 चा 48) (ज्याला यापुढे उक्त असे अधिनियम म्हटले गेले आहे) च्या कलम 3 अ चे उपकलम (1) अन्वये अधिसूचीत केलेली भारत सरकारच्या, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाची अधिसूचना का. आ. 1023(अ) दिनांक 28.02.2025 जे भारत सरकारच्या राजपत्र, असाधारण, भाग II, खंड 3, उपखंड (ii) मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती, महाराष्ट्र राज्याच्या पालघर जिल्ह्यातील तनाशी, या गावांतील NH-248S च्या 0.00 ते 11.400 आणि 28.700 ते 32.180 कि.मी. पर्यंतच्या (उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), पालघर) राष्ट्रीय महामार्गचे बांधकाम (रुंदीकरण/चार पदरी/आठ पदरीकरण इ.) देखभाल, व्यवस्था व वापर याकरिता जो भूखंड (जमीन) आवश्यक आहे त्याच्या संक्षिप्त तपशिलाचे खालील परिशिष्टामध्ये वर्णन करण्यात आले आहे. अशी जमीन संपादित करण्याच्या हेतू प्रित्यर्थ घोषणा त्या अनुसूचीद्वारे जाहीर करण्यात आली होतीय

आणि, उक्त अधिसूचना का.आ. 1023(अ) दिनांक 28.02.2025 चा सारांश उक्त अधिनियमाचे कलम 3-अ चे उपकलम (3) ला अनुसरून **दिनांक 21.03.2025 रोजी "दै. लोकमत" व "टाईम्स ऑफ इंडिया"** या दोन्ही वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित केला होता;

आणि सक्षम अधिकारी यांना कलम 3-क च्या अंतर्गत आक्षेप प्राप्त झाले होते, आणि त्यांनी त्यावर विचार केला आहे आणि ते निकालात काढले गेले आले आहेत.

आणि, सक्षम प्राधिकारी उक्त अधिनियमाच्या कलम 3-ड च्या उपकलम (1) ला अनुसरुन केंद्र सरकारला अहवाल सादर केला आहे.

आता, म्हणून केंद्र सरकार, सक्षम प्राधिकारी यांचा उक्त आपला अहवाल प्राप्त झाल्यावर आणि उक्त अधिनियमाच्या कलम 3-ड च्या पोटकलम (1) खाली प्राप्त झालेल्या शक्तींचा उपयोग करुन असे घोषित करीत आहे की, उक्त अनुसूचीमध्ये नमूद जमीनींचा उपरोक्त प्रयोजनासाठी संपादन करणे आवश्यक आहेय;

आणि पुढे, केंद्र सरकार उक्त अधिनियमाच्या कलम 3-ड च्या उपकलम (2) द्वारे असे घोषित करीत आहे की, ह्या अधिसूचनेच्या राजपत्रामध्ये प्रसिध्दी झाल्यानंतर, उक्त अनूसूचीमध्ये नमूद जमीनी सर्व बोजा विरहित पूर्णपणे केंद्र शासनाकडे अबाधितपणे निहीत होतील.

**अनुसूची**
**महाराष्ट्र राज्याच्या पालघर जिल्हयातील तनाशी, या गावांतील NH-248S च्या 0.00 ते 11.400 आणि 28.700 ते 32.180 कि.मी. पर्यंतच्या (उपजिल्हाधिकारी (भुसंपादन), पालघर) जमिनीच्या पट्ट्यात ग्रीनफील्ड महामार्गाच्या आत येणाऱ्या, संरचनेसह किंवा त्याशिवाय संपादित करावयाच्या जमिनीचे संक्षिप्त वर्णन**

जिल्हाः पालघर
https://egazette.gov.in
प्रकाशन दिनांक: 20.08.2025
https://morth.gov.in
https://bhoomirashi.gov.in

[फा.सं. NHAI/LA/GREENFIELD/NH/2023/3D]
शेख अमीनखान, संचालक

टीपः सदर अधिसूचनेची प्रत सक्षम प्राधिकारी/पीआययु/आरओ यांच्या कार्यालयातही उपलब्ध आहे आणि जमीन मालक सदर अधिसूना तेथे पाहू शकतील